# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः04.09.2026** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

1. इओएस-5 या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं इस्रोकडून यशस्वी प्रक्षेपण.
2. महिला बचत गटांच्या अडचणी दूर करण्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांचं आश्वासन
3. मुंबई ते सावंतवाडी रोड दरम्यान नवी नियमित रेल्वेगाडी सुरू.
4. सामूहिक जेवणाच्या कार्यक्रमांच्या आधी अन्न आणि औषध प्रशासनाला पूर्वसूचना द्यावी लागणार.
5. महिला टी-20 आशिया चषक स्पर्धेत भारताचा हाँगकाँगवर 137 धावांनी विजय.

**इस्रो**

इओएस-5 या भू-समकालिक कक्षेतील पहिल्या छायाचित्रण उपग्रहाचं इस्रोनं यशस्वी प्रक्षेपण केलं आहे. श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून GSLV प्रक्षेपकाद्वारे हे प्रक्षेपण करण्यात आलं. प्रक्षेपणानंतर सुमारे 18 मिनिटांनी हा उपग्रह निर्धारित कक्षेत यशस्वीरीत्या स्थापित करण्यात आला. या उपग्रहाद्वारे तात्काळ उपलब्ध होणाऱ्या प्रतिमांमुळं कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रांत देशाला मोठी मदत होईल. असं इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सांगितलं.

**शिवराज सिंह चौहान**

महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं आश्वासन केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं आहे. चौहान यांनी काल मुंबईत महिला बचत गटांच्या सदस्यांशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला. यावेळी महिला लाभार्थींनी कर्ज मंजुरी आणि वितरणातील विलंब यासह विविध अडचणी मांडल्या. या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असं शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. येत्या 5 वर्षात महिला बचत गटांना 10 लाख कोटींचे कर्ज देण्याचं आणि बचत गटातल्या महिलांना 1 लाख कोटी रुपयाचं कर्ज देण्याचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

**रेल्वे-वैष्णव**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून मुंबई-सावंतवाडी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसंच केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल याप्रसंगी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. गणेशोत्सव काळात प्रवाशांच्या सोयीसाठी यंदा साडे-तीनशे विशेष गाड्या चालवल्या जातील, तसंच आवश्यकतेनुसार जादा गाड्यांची व्यवस्था केली जाईल, असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. मुंबई-सावंतवाडी एक्स्प्रेसमुळे कोकणच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई आणि सावंतवाडी रोड दरम्यान दररोज ही एक्स्प्रेस चालविण्यात येणार आहे.

**सिंधुदुर्ग निसर्ग**

गणेशोत्सवापूर्वी मुंबईतील चाकरमान्यांना या रेल्वे गाडीची विशेष भेट मिळाली आहे. त्यातच कोकणातल्या निसर्गाचं बहरलेलं मनोहारी रूप त्यांच्या प्रवासाचा आनंद आणखी द्विगुणित करणार आहे. ऐकुया कोकणात सध्या सर्वत्र दिसणाऱ्या या नयनरम्य देखाव्याचं सविस्तर वर्णन आमच्या प्रतिनिधीकडून...

*पावसाळ्याचा उत्तरार्ध सुरू झाल्याची जणू साक्षच देणारी ही रंगीबेरंगी रानफुल सिंधुदुर्गच्या डोंगर पठारावर बहरलीत. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांच लक्ष वेधून घेणार हे मनोहारी दृश्य सध्या कोकणच्या निसर्ग सौंदर्यात भर घालतंय. हिरवाईच्या पार्श्वभूमीवर उमललेली निळी, पांढरी आणि विविध छटांची फुल पाहताना निसर्गानेच गणरायाच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट केल्याचा भास होतोय. कोकणातल्या गणेशोत्सवाच्या पारंपरिक सजावटीत 'हरण' आणि 'निळी परडी' यांना विशेष महत्त्व आहे. गणेश चतुर्थीच्या काळात घरातली माटवी सजवण्यासाठी पूर्वापार या रानफुलांचा वापर केला जातो. त्यामुळे या फुलांच बहरणे हे केवळ निसर्गसौंदर्य नसून कोकणच्या लोकपरंपरा आणि गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक वारशाशी जोडलेल एक भावनिक नात आहे.*

*मात्र, या निसर्गसौंदर्यामागे चिंतेची किनारही आहे. बदलत हवामान, पर्यावरणातले बदल आणि मानवी हस्तक्षेप यांचा परिणाम या रानफुलांच्या वाढीवर होत असल्याच जाणकारांच म्हणण आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत या फुलांच प्रमाण कमी होत असल्याचही दिसून येतंय. म्हणूनच गणेशोत्सवाच्या निमित्तान या पारंपरिक रानफुलांच महत्त्व पुन्हा अधोरेखित होत असताना, त्यांच संवर्धन आणि नैसर्गिक अधिवासाच जतन करण्याची गरज व्यक्त होत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.*

**श्रीकृष्ण जन्माष्टमी**

कृष्णजन्माष्टमीचा सण आज देशभरात उत्साहात साजरा केला जात आहे. विशेषतः उत्तर प्रदेशत मथुरा वृंदावन इथं जन्माष्टमीचा जल्लोष आहे. राज्यातही सर्व कृष्ण मंदिरांमध्ये मध्यरात्री साजऱ्या होणाऱ्या कृष्ण जन्मोत्सवाची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. सर्व मंदिरांना आकर्षक सजावट करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरिकांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**गणेशोत्सव**

गणेशोत्सवातील उत्साह कायम ठेवत ध्वनी मर्यादेचं काटेकोर पालन करणं आवश्यक आहे, अशी अपेक्षा पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केली. विविध गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांनी काल संवाद साधला. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करताना सामाजिक आणि कायदेशीर मर्यादा पाळणे आवश्यक असल्याचं ते म्हणाले. कोणत्याही परिस्थितीत ध्वनीमर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता मंडळांनी घ्यावी, असं आवाहन त्यांनी केलं. लेसर लाईटवर पूर्णपणे बंदी असल्याचं ही त्यांनी स्पष्ट केलं. ध्वनी प्रदूषणाविरोधात भूमिका घेणारे विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ल्याचा कुमार यांनी निषेध केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बापट यांच्यावरील हल्ल्याचा निषेध केला आहे. आपला गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीनं साजरा करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत असं आवाहन त्यांनी केलं. पहिल्या वर्षी कदाचित 100 टक्के होणार नाही परंतु 100 टक्के जाण्याकडे आपण प्रयत्न केले पाहिजेत, एकमेकांच्या भावना आपण समजून घेतल्या पाहिजेत असं मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान नागपूर पोलिसांनी सणासुदीच्या काळात मोठ्या आवाजाच्या ध्वनियंत्रणा, बीम्स आणि लेजर लाइट्सवर बंदी घातली आहे. आज संध्याकाळी 4 वाजल्यापासून 1 नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत ही बंदी लागू राहील.

**सोलापूर**

सोलापुरातही गणेशोत्सव मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईटला बंदी घालण्यात आली आहे. 13 ते 26 सप्टेंबर या कालवधीत ही बंदी लागू असेल, याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जारी केले आहेत.

**FDA परवानगी**

महाप्रसाद, इफ्तार पार्टी, अन्नछत्र, लंगर किंवा भंडारा अशा सामूहिक जेवणाच्या कार्यक्रमांसाठी आता किमान सात दिवस आधी अन्न आणि औषध प्रशासनाला पूर्वसूचना द्यावी लागणार आहे. कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेला नमुना हा संबंधित

स्थानिक अधिकाऱ्यांकडे द्यावा लागेल अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिली आहे. या कार्यक्रमांसाठी अन्न शिजवणारे आणि पुरवणारे हे दोघेही केटरिंगच्या कक्षेमध्ये येतात. त्यामुळे त्यांच्याकडे आवश्यकतो परवाना असणं बंधनकारक आहे.

**मराठा आरक्षण**

राज्य सरकारच्या शिष्टमंडळानं काल मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटी इथं भेट घेतली. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत, प्रसाद लाड यांच्यासह अन्य यावेळी उपस्थित होते.

गावागावामध्ये कुणबी नोंदींच्या याद्या लावण्याच्या मागणीला शिष्टमंडळानं होकार दिला. हे काम 5 सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचं आश्वासन यावेळी देण्यात आलं. तसंच हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटप करता येतील, असं सरकारच्या शिष्टमंडळाने सांगितलं. मात्र मराठा आरक्षणासंदर्भातील सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार णंही, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी जाहीर केली.

दरम्यान जरांगे यांच्या आंदोलनाच्या समर्थनाथ काल जालना, धुळे, लातूर, नांदेड, धारशिव हिंगोली  जिल्ह्यात अनेक ठिकाणी बंद पुकारण्यात आला.

**क्रिकेट**

महिला टी-20 आशिया चषक स्पर्धेत काल भारताने हाँगकाँगचा 137 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने 20 षटकांत 5 गडी गमावून 193 धावांचा डोंगर उभा केला. भारताकडून स्मृती मानधनाने 64 चेंडूंत 124 धावांची उत्कृष्ट खेळी केली. मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना हाँगकाँगचा संघ 17 व्या षटकांत अवघ्या 56 धावांवर सर्वबाद झाला. दीप्ती शर्माने 9 धावा देत 3, नंदानीने 2, तर प्रेमा रावतने 2 बळी घेतले. स्मृती मानधना हिला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं. भारताचा पुढील सामना उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

**अहिल्यानगर-पाऊस**

पावसानं दडी मारल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने दुष्काळ जाहीर करावा. तसंच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीनं आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयात तुरळक ठिकाणी आज पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.